# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/09/2023 (शुक्रवार) सकाळ


## पोलीस स्टेशन कुही हद्दीत रेती तस्करावर कुही पोलीसांची धडक कारवाई

पोस्टे कुही हद्दीतील दुरक्षेत्र पाचगाव परिसरातील नागपुर उमरेड रोड दरम्यान रेतीची मोठ्या प्रमाणात अवैध्य वाहतूक होत असल्याची गोपनिय माहीती कुही पोलीसांना मिळाल्याने दिनांक ०७/०९/२०२३ रोजी पोलीस स्टेशन कुही येथिल अधिकारी व स्टाफसह वरिष्ठांना माहीती देवून मा. अनिल मस्के सा. भापोसे सहा. पोलीस अधिक्षक तथा ठाणे प्रभारी यांचे नेतृत्वात सदर मार्गावर जावून पेट्रोलींग केली असता नागपुर ते उमरेड या राष्ट्रीय महामार्ग क्र. ३५३ (ड) वर मौजा भिवापुर शिवार वि आय टी कॉलेज जवळ टिप्पर वाहन क्र. MH 49 BZ 3966 या वाहनामध्ये अवैध्यरित्या बिनापरवाना रेती भरून वाहतुक करतांना मिळून आल्याने सदर वाहन चालक नामे अनिल फाये, रा. नागपुर याला ताब्यात घेवुन पोलीस चौकी पाचगाव येथे आणून विचारपुस केली असता त्याने सांगीतले की अशाच प्रकारची विना रॉयल्टी रेतीची वाहतुक करणारे टिप्पर उमरेड पोलीस स्टेशनचा हद्दीतील लोधा कंपनीजवळ उभे आहे अशा माहीती वरूण पोलीस स्टेशन उमरेड येथील पोलीस अंमलदार व मा. तहसिलदार साहेब तहसिल कार्यालय उमरेड यांना सदर घटनेबाबत माहीती देवून घटनास्थळी बोलावुन संयुक्तरित्या कार्यवाही करूण सर्व संबंधीत वाहनावर महसुल विभागाअंर्तगत कार्यवाही करणेकामी महसुल विभागाचा ताब्यात वाहने देण्यात आले आहे. सदरचा कार्यवाहीमध्ये टिप्पर वाहन क १) MH40 BG 4229 २) MH40 BL 9334 ३) MH40 CH 7935 ४) MH 34 B 2191 5) MH40 CD 6231 किंमती २०,००,००० रू. प्रति टिप्पर प्रमाणे १,००,००,००० रू. व सर्व टिप्परमधील एकूण रेती ३७.५ बॉस प्रति बॉस ४००० रू. प्रमाणे १,५०,०००० रू. असा एकुण १,१५,००,०००रु. चा मुद्देमाल जप्त करूण पुढील कार्यवाही मा. तहसिलदार साहेब तहसिल कार्यालय उमरेड हे करीत आहे. तसेच वाहन क्र. MH49 BZ 3966 या वाहनावर पोस्टे कुही येथे गुन्हा नोंद करूण पुढील कार्यवाही पोलीस स्टेशन कुही येथील पोलीस करीत आहे. सदर कार्यवाहीत एकुण ०६ टिप्पर किंमती २०,००,००० रू. प्रमाणे १,२०,००,०००रू. व त्यामधील रेती १,८२,०००रू. असा एकूण १,२१,८२,००० रू. चा माल जप्त करण्यात आला असुन पुढील कार्यवाही सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार सर भापोसे तसेच अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी ठाणेदार IPS अनिल म्हस्के पोस्टे कुही तहसिलदार श्री संदीप पुंडेकर तहसिल कार्यालय उमरेड, पोस्टे कुही येथील पोउपनि देवीदास ठमके, पोना हरिदास चाचरकर, रोशन नारनवरे, पोशी दुर्गेश डहाके, अनिल करडखेले, सदीप सहारे, ऋषीकेश फुले तसेच पोस्टे उमरेड येथील सफौ. अजित ठाकुर, पोहवा प्रदीप चवरे, पोना पंकज बट्टे, विनोद भोयर, पोशि समाधान पवार, चापोना सचीन बडगे यांनी यशस्वीपणे पूर्ण केलेली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर